| MHKO070010632016 | **नि.दि.दावा क्र.१९९/२०१६**<br>**सौ.शांताबाई सुरेश चौगुले**<br>**वि.**<br>**श्री.बापुसो जिनदत्त सुर्यवंशी वगैरे** |
|---|---|

**नि.क्र.४० खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीने सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ तसेच ऑर्डर १ रुल १० प्रमाणे दावा दुरूस्ती कामी दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादीविरुध्द दावा वाटपाचा पृथक कब्जाचा, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी सदर दावे कामी सदर अर्ज कलम ३ ते ७ मध्ये नमुद दुरुस्त्या करणेबाबत परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे त्यांचे वकीलांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि.क्र.४७ वर व प्रतिवादी नं.३ ने नि.क्र.४५ वर नोंदवून अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत व अर्ज खर्चासह नामंजूर करणेविषयी विनंती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी केलेली आहे.

५. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## कारण मिमांसा

**मुद्या क्र. १ करिता**

६. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द वाटप, पृथक कब्जा, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. **स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर.२००७–एस.सी. ११३** या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे.

७. वादीचा अर्ज पाहता वादी सदर काही दुरुस्ती ही दावा प्रलंबित काळात झालेल्या तथाकथीत घटनेच्या अनुरुप आहे. वादीने त्या अनुषंगाने कागदपत्रे नि.क्र.४२ सोबत दाखल केलेली आहेत. वादीची प्रस्तावित दुरुस्तीची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींना अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी हे कुठल्याही प्रकारे नविन केस मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख–या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत मी येत आहे. वादीचा अर्ज पाहता multiplicity of proceeding टाळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य राहील. तसेच वादी कथीत नवीन पक्षकार हे प्रस्तुत प्रकरणात आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत आहे. वादीने अर्जामध्ये नमुद केलेल्या दि.५.८.१९९३ व दि.२३.८.१९९६ रोजी बाबतचा मजकूर नमुद करणेस जो वेळ घेतलेला आहे. त्या अनुषंगाने प्रतिवादींना खर्च मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे वरील सर्व कारणांचा सारासार विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज रक्कम रु.३५०/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीने सदर खर्च पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी द्यावा.

३. वादीने सदर खर्च प्रतिवादींना दिल्यानंतर प्रस्तावित दुरुस्ती करावी.

४. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.05.05 18:05:10 +0530

**(अ.त्रिं.मनगिरे)**

दिनांक ०५/०५/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
जयसिंगपूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | $2^{nd}$ Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 05/05/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 05/05/2025. |
| Judgment/order uploaded on | 05/05/2025. |